# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/11/2022 (गुरूवार) सकाळ

### विनयभंग

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील पारडी गोतमारे येथे दिनांक १५/११/२०२२ चे १८.०० वा ते १८.१५ वा. फिर्यादी नामे— सौ. वर्षा शंकरराव गोतमारे, वय ४३ वर्ष, रा. पारडी गोतमारे व आरोपी नामे— अजय उर्फ पप्पू सुखदेवराव तागडे, रा. पारडी गोतमारे हे एकाच गावचे रहिवाशी असून नमुद घटना तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी आपले घरी हजर असताना आरोपी हा ‘‘दही विकत पाहिजे’’ असे म्हणून फिर्यादीचे घरात जाऊन फिर्यादी दही आणणेसाठी आत गेली असता आरोपी हा फिर्यादीचे मागे जाऊन फिर्यादीला लज्जा येईल अशी मिठी मारली व फिर्यादीचे तोंड दाबून चूप राहण्यास सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (अ), ४५१ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन काटोल करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा लोहारा शिवार येथे दिनांक १५/११/२०२२ चे सायंकाळी ०६.३० वा. ते २१.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— रोहीत गजानन बावनकुळे, वय ३७ वर्ष, रा. आशा हॉस्पीटल रामलक्ष्मी सोसायटी याचे बंद पडलेल्या प्लॉट मधुन सुपरवायझर जेवण करण्याकरीता घरी गेला असता फिर्यादीचे मालकीचे १) Blower with motor 2HD किमती १५०००/—रू. २) motor 10 HP1 नग अंदाजे किमती अंदाजे १०,०००/—रू. ३) C.I trolley ५ नग अंदाजे कि ५००००/—रू. असा एकुण ७५०००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन रामटेक करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर